ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येणाऱ्या ई-निविदेबाबत सूचना...

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः** विपप्र-२०२१/प्र.क्र.३२/बांधकाम-४

५ वा मजला, मर्झबान पथ, २५ बांधकाम भवन,

फोर्ट, मंत्रालय, मुंबई-०१

तारीख: ०६ जुलै, २०२१

**प्रस्तावना :**

ग्रामपंचायत स्तरावरील ईनिविदे-बाबतचे कामकाज शासनाच्या प्रचलित धोरणानुसार होणे क्रमप्राप्त आहे. तथापि, ग्रामपंचायत स्तरावरील ईनिविदे-संदर्भात शासनास वारंवार तक्रारी प्राप्त होतात. सबब, ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येणाऱ्या ई-निविदेबाबत सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :**

ग्रामपंचायत स्तरावरील ई-निविदेबाबतचे कामकाज पारदर्शकरित्या पार पडणे आवश्यक आहे. यास्तव, ग्रामपंचायत स्तरावरील ई-निविदेबाबत मा.मंत्री (ग्रा.वि.) यांनी निर्देशित केल्यानुसार, खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१) ग्रामसेवक, सरपंच व तांत्रिक अधिकारी यांना ई-निविदेच्या कार्यप्रणालीबाबत प्रशिक्षण देण्यात यावे.

२) गट विकास अधिकारी यांनी ई-निविदा प्रक्रिया प्रत्येक ग्रामपंचायतीकडून गोपनीयतेचा भंग न होता, पारदर्शक पद्धतीने राबवून घ्यावी.

३) एकाच कंत्राटदाराला वित्तीय वर्षात त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या साधन सामुग्रीचा विचार करून कामे द्यावीत.

४) मटेरिअल पुरवठा करण्याच्या कालावधीमध्ये स्थानिक स्तरावर उपलब्ध असलेल्या सुविधा व अंतर याचा विचार करून किमान १ महिन्याचा कालावधी साहित्य पुरवठा करण्यास देण्यात यावा.

५) रद्द करण्यात येणाऱ्या ई-निविदेसंदर्भात स्पष्ट कारण नमुद करून संबंधितांस कळविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Jain

**(प्रविण जैन)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. अ.मु.स. (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव (मु.मं.ग्रा.स.यो.), ग्राम विकास विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
६. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
७. कार्यकारी अभियंता (बांध.), जिल्हा परिषद, सर्व.
८. निवडनस्ती कार्यासन बांधकाम-४, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.